दैनिक
# महावृत्त
E-Mail:dainikmhavratt@gmail.com
संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990
लातूर वर्ष ४ थे अंक ११७ वा शुक्रवार दि.११ ऑक्टोंबर २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

## पानगाव ते खरोळा फाटा रस्त्याचे काम सुरु; आ. कराड यांच्या प्रयत्नातून दोन महिन्यापासून सुरू असलेले बेमुदत उपोषण मागे




लातूर / प्रतिनिधी :- रेणापूर तालुक्यातील पानगाव ते खरोळा फाटा दरम्यानचे रस्त्याचे काम तात्काळ सुरू व्हावे यासह विविध १२ मागण्यांसाठी गेल्या दोन महिन्यापासून सुरू असलेले बेमुदत साखळी उपोषण भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रयत्नातून विविध मागण्या पूर्णत्वास येत असल्याने आणि रस्त्याचे कामाला प्रत्यक्ष सुरू झाल्याने सुकेश भंडारे यांच्या नेतृत्वात सुरू असलेले बेमुदत साखळी उपोषण गुरुवारी दुपारी मागे घेण्यात आले. यावेळी स्थापना करण्यात आलेल्या श्रीगणेशाचे विसर्जन करण्याचा निर्णय घेऊन यावेळी आ. कराड यांच्या हस्ते आरती करण्यात आली.

रेणापूर नजीक खरोळा फाटा येथे सुरू असलेल्या उपोषण स्थळाला आ. रमेशआप्पा कराड यांनी गुरुवारी भेट देऊन विविध मागण्यांबाबत सविस्तर चर्चा केली. बहुतांशी मागण्या मान्य झाल्याने उपोषण मागे घेण्याची विनंती केली असता आ. कराड यांच्या विनंतीचा मान राखून उपोषणकर्त्यांनी बेमुदत साखळी उपोषण मागे घेण्याचा निर्णय घेतला. यावेळी अप्पर जिल्हाधिकारी सौ. संगिता टकले, रेणापूरच्या तहसीलदार मंजुषा भगत, भाजपाचे नवनाथ भोसले, ओमप्रकाश गोडभरले, दशरथ सरवदे, अभिषेक आकनगिरे, सतीश आंबेकर, वसंत करमुडे, अमर चव्हाण, श्रीकृष्ण मोटेगावकर, विजय चव्हाण यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलताना आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, पानगाव ते खरोळा फाटा दरम्यानच्या रस्त्याचे काम व्हावे यासाठी अनेक वेळा मी स्वतः प्रयत्न केले. मात्र काही जणांनी शेतकऱ्याची दिशाभूल आणि गैरसमज निर्माण करून अडचणी निर्माण केल्या, काम बंद पाडले. दरम्यान केंद्रीय मंत्री नितीनजी गडकरी साहेब यांना प्रत्यक्ष भेटून या रस्त्याच्या कामाला दुसऱ्यांदा मंजुरी मिळवून आणली. तरीही अडचणी कायम राहिल्या. अनेक गावच्या नागरिकांना अतोनात त्रास सहन करावा लागत आहे यामुळे जिद्दी आणि तत्वाचा कार्यकर्ता सुकेश भंडारे यांनी गेल्या १५ ऑगस्ट पासून या परिसरातील सर्वांना सोबत घेऊन बेमुदत साखळी उपोषण केले. नव्वद टक्के जनतेनी पाठिंबा दिला. रस्त्यालगतच्या बहुतांशी शेतकऱ्यांनी संमती दिल्याने, रस्त्याच्या कामाचा मार्ग मोकळा झाला असून मी स्वतः वेळोवेळी संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा करून प्रयत्न केले. आज या कामाला प्रत्यक्ष सुरुवात झाली आहे. येत्या काळात निश्चितपणे गती मिळेल असे सांगून रस्त्याच्या कामाचा विजयादशमी दिवशी आनंद उत्सव साजरा करावा असे बोलून दाखविले.

पानगाव ग्रामीण रुग्णालयास लवकरच मंजुरी मिळेल कदाचित आचारसंहितेपूर्वी निर्णय होईल, पानगाव येथे पोलीस स्टेशन व्हावे यासाठी कार्यवाही सुरू असून गृहमंत्री देवेंद्रजी फडणवीस सकारात्मक आहेत अशी माहिती देऊन आ. रमेशआप्पा कराड यावेळी बोलताना म्हणाले की, विकासाला दिशा देणारे आणि गोरगरीब सर्वसामान्य जनतेला वंचितांना न्याय देण्याची भूमिका घेणारे राज्यातील महायुतीचे शासन आहे. पानगावच्या विठ्ठल रुक्मिणी मंदिरासह मतदारसंघातील असंख्य मंदिराच्या जिर्णोदरासाठी कोट्यावधी रुपयाचा निधी शासनाच्या माध्यमातून उपलब्ध करून दिला असल्याची माहिती त्यांनी यावेळी बोलताना दिली.

प्रारंभी सुकेश भंडारे यांनी विविध मागण्या आपल्या मनोगतातून बोलून दाखवल्या यातील बहुतांशी कामांना आ. रमेशआप्पा कराड यांच्या माध्यमातूनच मंजुरी आणि कामांना गती मिळाली असल्याचे बोलून दाखविले. उपोषण मागे घेण्याचा निर्णय घेतल्यानंतर उपोषण स्थळी स्थापना करण्यात आलेल्या श्री गणेशाचे विसर्जन करण्याचा निर्णय घेण्यात आल्याने यावेळी आ. कराड यांच्या हस्ते आरती करण्यात आली.

यावेळी सरपंच लक्ष्मण यादव, धर्मराज मोटाडे, ज्ञानोबा गुडे, आणामे मामा, राम भंडारे, कमलाकर अनाने, डॉ. हेरकर, श्रीकृष्ण जाधव, गणेश तूरूप, मारुती गालफाडे, अविनाश मोटाडे, बाबुराव कस्तुरे, सूर्यकांत आकनगिरे, गोविंद नरहरे, जयप्रकाश जटाळ, महेश सुडे, बालाजी खरोळे, राजेंद्र महाराज, दिलीप आकनगिरे, राजू आलापुरे, नाथराव गीते, चंदू भंडारे, राम फुले, संतोष मध्ये गोविंद मोटेगावकर, रवी देशमुख, दिलीप बरुरे, सुधाकर बरुळे, शफिक पठाण, संजय हनवते, रमाकांत वाघमारे, विजय चव्हाण, शरद राऊतराव, सुरेश बुड्ढे, यांच्यासह या रस्त्यालगत असलेल्या मूरढव, पाथरवाडी, भंडारवाडी, मुसळेवाडी, घनसरगाव, नरवटवाडी, हनुमंतवाडी, रामवाडी (प), गोविंदनगर, रेणापूर, मोहगाव येथील विविध लोकप्रतिनिधी, नागरिक, शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भाजपा नेते आ. रमेशअप्पा कराड यांच्याकडून रेणापूर येथे आदिशक्ती श्रीरेणुका देवीची महापूजा




लातूर/ प्रतिनिधी :- असंख्य भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या रेणापूर येथील आदिशक्ती श्री रेणुका देवी मंदिरात नवरात्र उत्सव मोठ्या उत्साहाने साजरा केला जात असून भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी गुरुवारी सकाळी सपत्नीक महापूजा करून भक्तीभावे दर्शन घेतले.

प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी रेणापूर येथे आदिशक्ती श्री रेणुका देवी नवरात्र महोत्सव मोठ्या उत्साहाच्या वातावरणात साजरा करण्यात येत असून यानिमित्ताने भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड आणि त्यांच्या सुविद्यपत्नी संजीवनीताई कराड यांनी गुरुवारी सकाळी रेणुका मातेची पूजा व आरती करून मनोभावे दर्शन घेतले. मंदिर परिसराच्या विविध विकास कामासाठी आ. कराड यांनी कोट्यावधी रुपयाचा निधी राज्य शासनाच्या माध्यमातून मिळवून दिला त्याबद्दल मंदिर ट्रस्टच्या वतीने यावेळी यथोचित सत्कार करण्यात आला. याप्रसंगी भाजपा पंचायत राज सेलचे जिल्हा संयोजक नवनाथ भोसले, तालुकाध्यक्ष दशरथ सरवदे, जिल्हा उपाध्यक्ष सतीश आंबेकर, माजी नगराध्यक्ष अभिषेक आकनगिरे, उद्योजक जगदीश कुलकर्णी, मंदिर ट्रस्टचे राम पाटील, तुकाराम कोल्हे, रमाकांत वाघमारे, प्रशांत आकनगिरे, मनोहर व्यवहारे, शहाजी कातळे, दिलीप आकनगिरे, भाजपाचे श्रीकृष्ण मोटेगावकर, चंद्रकांत कातळे, अमर चव्हाण, दत्ता सरवदे, अच्युत कातळे, संतोष राठोड, विजय चव्हाण, महेश गाडे, राजकुमार आलापुरे, शेख अजीम, उत्तम चव्हाण, उज्वल कांबळे, अंतराम चव्हाण, गोविंद राजे, राजू आतार, दिलीप चव्हाण, लखन आवळे, गणेश चव्हाण, नंदकुमार मोठेगावकर, नारायण राठोड, नरसिंग येलगटे, संजय म्हेत्रे, सोपान सातपुते, शरद चक्रे, योगेश राठोड, मनोज चक्रे, रोहित खुमसे, पप्पू कुडके यांच्यासह भाजपाचे कार्यकर्ते लोकप्रतिनिधी पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी नवी परंपरा सुरू करून इतरांना दिली प्रेरणा



लातूर :- सर्वसाधारणपणे वाढदिवसाच्या निमित्ताने आई मुलाचे औक्षण करत असते परंतु कधी मुलांनी आईचे औक्षण करून शुभेच्छा दिल्याचे आपण पाहिले नव्हते. २०१९ साली लातूर ग्रामीणचे आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी आई (वैशालीताई) यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने त्यांचे औक्षण केले होते. औक्षण करतानाचा तो क्षण त्यांनी सोशल मीडियावर शेअर केला होता. असंख्य लोकांनी या कृतीचे कौतुक देखील केले होते. आईच्या प्रती आपली असलेली श्रद्धा व प्रेम अनोख्या पद्धतीने व्यक्त करण्याची ही पद्धत डोळ्यासमोर ठेवून अनेकांनी याचे अनुकरण केले. आईच्या वाढदिवसानिमित्त औक्षण करून अनेकांनी शुभेच्छा दिल्याचे आपण अनेकदा पाहीले व ऐकले आहे.



आई आणि मुलाचं असलेल्या नात्यास अधिक घट्ट करत एक नवी परंपरा यातून सुरू झाली.

आज दि. १०/१०/२०२४ रोजी आपल्या बाभळगाव निवासस्थानी आमदार अमित देशमुख व आमदार धिरज देशमुख यांनी श्रीमती वैशालीताई देशमुख यांचे औक्षण करून वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. आमदार धिरज विलासराव देशमुख यांच्या व्यक्तिमत्वातचा हा पैलू सर्वांना मनापासून भावला असून एक नवी परंपरा व चांगली संस्कृती रुजवण्याचे काम आमदार धिरज देशमुख करत असल्याचे दिसत आहेत

## केजच्या स्मार्ट श्रीमती विजेत्या सौ.रेश्मा बांगर तर उपविजेत्या सौ.सुनीता राऊत



केज/प्रतिनिधी :- केज रोटरी तर्फे दरवर्षी नवरात्र महोत्सवानिमित्त घेतल्या जाणाऱ्या केज स्मार्ट श्रीमती स्पर्धेत केजच्या सौ.रेश्मा जीवन बांगर यांनी प्रथम क्रमांक मिळवून केज स्मार्ट श्रीमती बनण्याचा बहुमान मिळवला तर सौ. सुनीता संतोष राऊत यांनी उपविजेतेपद पटकावले. विजेत्यांना डिस्ट्रिक्ट पब्लिक इमेज डायरेक्टर रवींद्र बनकर, रो किशोर दाताळ, केज रोटरी अध्यक्ष प्रकाश कामाजी, हनुमंत भोसले, प्रवीण देशपांडे, अरुण अंजाण, दादाराव जमाले पाटील सुशील टोपे व नगराध्यक्षा सौ. सीताताई बनसोड यांच्या हस्ते पारितोषिक वितरण झाले. रोटरी क्लब ऑफ केज आणि भवानी माता उत्सव समितीच्या वतीने ही स्पर्धा मंगळवारी भवानी मंदिर प्रांगणात पार पडली. या स्पर्धेत विविध खेळाच्या स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धेत २०० महिलांनी सहभाग नोंदवला होता. निवडफेरी सह इतर चार फेऱ्यानंतर अंतिम फेरी पार पडली. या स्पर्धेत २० पैकी १९ गुण मिळवून सौ. रेश्मा जीवन बांगर या प्रथम स्थानी आल्या तर सौ.सुनीता संतोष राऊत या दुसऱ्या क्रमांकावर राहिल्या. या स्पर्धेत केजची मयुरी संतोष राऊत या केजच्या कन्येने आपल्या नोकरीच्या पहिल्या पगारातून पहिल्या चार विजेत्यांना चार पैठणी भेट दिल्या. याबद्दल तिचे कौतुक होत आहे. या स्पर्धेसाठी गिरीराज कलेक्शन, मैत्री कलेक्शन, अभिजित कलेक्शन, कोहिनुर कलेक्शन, अतुल प्रोव्हिजन्स, पांडुरंग मिटकरी, सुरभी एम्पोरियम, पारस मयूर स्वीट होम, व्यंकटेश स्टील सेंटर यांनी विजेत्यांना भेटवस्तू दिल्या. हनुमंत भोसले यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अध्यक्ष प्रकाश कामाजी यांच्यासह रो अरुण अंजाण, दादाराव जमाले पाटील, प्रवीण देशपांडे, सूर्यकांत चवरे यांनी विशेष परिश्रम घेतले.

## स्व.यशवंतराव चव्हाण यांच्या समाधीचे दर्शन घेऊन प्रा.ईश्वर मुंडे यांनी दिली पक्षाकडे मुलाखत



किल्ले धारूर/प्रतिनिधी :- सध्या महाराष्ट्राच्या राजकारणात खा.शरदचंद्र पवार हे बीग बॉस च्या भूमिकेत दिसत आहेत. राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पक्षात अनेकांचे इन कमिंग होत आहेत कांही जन रांगेत उभे आहेत.

राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडे ज्या ईच्छूक उमेदवारांनी अधिकृत पक्षाचे सदस्यत्व फीस व नाममात्र पक्ष निधी जमा केलेला आहे अशा इच्छूक उमेदवीरांच्या मुलाखती मार्केटयार्ड पुणे येथील निसर्ग कार्यालयात दि.५ ाक्टोबर २०२४ शनिवारी घेण्यात आल्या.

या मुलाखतीसाठी दस्तूर खुद खा.शरदचंद्र पवार,खा.फौजिया खान,खा. वंदना चव्हाण,आ.राजेश टोपे,खा.बजरंग बप्पा सोनवणे,आ.रोहीत पवार,महेबुब शेख,राज राजापूरकर,हिरालाल राठोड,डॉ.नरेंद्र काळे यांचे सह पार्लमेंट्री बोर्ड चे सदस्य उपस्थीत होते.

सर्वच इच्छूक उमेदवार पक्षाकडे मुलाखती देत आसतात परंतू प्रा. ईश्वर मुंडे यांची मुलाखत ही वैशिष्टय पूर्ण झाली. याचे कारण म्हणजे हिमालयाच्या मदतीला धावलेले सह्याद्री, पुरोगामी विचारांचा वसा व वारसा चालवणारे,खा.शरदचंद्र पवार यांचे श्रध्दास्थान, महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री स्व.यशवंतराव चव्हाण साहेब यांच्या प्रिती संगम (कृष्णा - कोयना) कराड जि. सातारा येथील समाधीचे दर्शन घेऊन,आशिर्वाद घेऊन मुलाखत दिली. आपली पक्ष निष्ठा व खा.शरदचंद्र पवार यांच्या सोशल इंजिनिअरींच्या राजकीय खेळीमुळे आपल्यालाच उमेदवारी मिळेल या आत्मविश्वासाने प्रा.ईश्वर मुंडे यांनी मतदार संघात जन संपर्क वाढवला आहे.

उच्च शिक्षीत,स्वच्छ प्रतिमा व सर्व समावेशक चेहरा या मुळे प्रा.ईश्वर आनंदराव मुंडे यांना माजलगाव मतदार संघातील मतदारांकडून पसंती मिळत आहे.

## हिज्ब-उत-तहरीर दहशतवादी संघटनेवर बंदी

नवी दिल्ली : दहशतवादाविरोधात केंद्र सरकारची झिरो टॉलरन्स पॉलिसी आहे. दरम्यान, गृह मंत्रालयाने गुरुवार दि. १० ऑक्टोबर रोजी जागतिक पॅन इस्लामिक फुटीरवादी संघटना हिज्ब-उत-तहरीरवर बंदी घातली आहे. मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, जिहादद्वारे लोकशाही सरकार उलथून टाकून भारतासह जागतिक स्तरावर इस्लामिक राज्य आणि खिलाफत स्थापन करणे, हे या संघटनेचे उद्दिष्ट आहे. गृह मंत्रालयाने या संघटनेला भारताच्या लोकशाही प्रणाली आणि अंतर्गत सुरक्षेसाठी गंभीर धोका म्हटले आहे. केंद्रीय गृहमंत्रालयाने या संघटनेवर बंदी घालताना सांगितले की, ही संघटना एक जागतिक पॅन-इस्लामिक कट्टरतावादी संघटना आहे, ज्याची स्थापना १९५३ मध्ये जेरुसलेममध्ये झाली होती. या संघटनेला आता सरकारनी प्रतिबंधित संघटना म्हणून घोषित केले आहे.

दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

## संपादकीय....

# पुन्हा चर्चा चेहर्याची

लवकरच होणार्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पुन्हा एकदा मुख्यमंत्रिपदाच्या चेहर्याची चर्चा सुरू झाली आहे. हरियाणामध्ये काँग्रेस पक्षाला विधानसभा निवडणुकीत यश मिळवण्याची १०० टक्के खात्री असतानाही भाजपने तिसर्यांदा सत्ता मिळवून हॅट्रिक साधली. त्याची जी विविध कारणे सांगितली जात आहेत त्यामध्ये मुख्यमंत्रिपदाचा चेहरा हे सर्वात महत्त्वाचे कारण आहे. म्हणजेच काँग्रेसने या निवडणुकीमध्ये आपला मुख्यमंत्रिपदाचा कोणताही चेहरा प्रोजेक्ट केला नाही म्हणून त्यांना या निवडणुकीमध्ये पराभव पत्करावा लागला. तर भारतीय जनता पक्षाने जाणीवपूर्वक नायबसिंग सैनी यांचा चेहरा मुख्यमंत्री म्हणून समोर आणला म्हणून त्यांनी या निवडणुकीमध्ये विजय मिळवला अशा प्रकारची कारणमीमांसा चर्चेला आली आहे. याच पार्श्वभूमीवर महाराष्ट्रामध्ये उद्धव ठाकरे यांनी पुन्हा एकदा मुख्यमंत्रिपदाचा चेहरा हा विषय उपस्थित केला आहे. जम्मू आणि काश्मीर केंद्रशासित प्रदेशाचा विचार करता तेथे काँग्रेस आणि नॅशनल कॉन्फरन्स यांची जरी युती असली, तरी मुख्यमंत्रिपदाचा चेहरा उमर अब्दुल्ला असतील हे गृहीत होते. निवडणुकीत यश मिळाल्यानंतर फारूक अब्दुल्ला यांनी थेट उमर अब्दुल्ला यांच्याच नावाची घोषणा केली आहे. या सर्व पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरे यांनी महाराष्ट्र विधानसभेसाठी काँग्रेस किंवा राष्ट्रवादी काँग्रेस मुख्यमंत्रिपदाचा चेहरा म्हणून ज्या नेत्याची घोषणा करतील त्याला आम्ही बिनशर्त पाठिंबा देऊ, असे म्हटले आहे. उद्धव ठाकरे यांनी अप्रत्यक्षपणे दबाव तंत्राचा वापर करून आणि हरियाणातील काँग्रेसच्या पराभवाचे कारण समोर करून महाराष्ट्र विधानसभा निवडणूक जिंकायची असेल, तर मुख्यमंत्रिपदाचा चेहरा प्रोजेक्ट करणे महत्त्वाचे आहे, हे पुन्हा एकदा अधोरेखित करण्याचा प्रयत्न केला आहे. आतापर्यंत जेव्हा जेव्हा उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्रिपदाचा चेहरा हा विषय उपस्थित केला होता तेव्हा त्यांना असे अपेक्षित होते की या पदासाठी आपले नाव समोर यावे. पण आता उद्धव ठाकरे यांनी आपल्या या भूमिकेमध्येही बदल केला आहे. काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस हे दोन पक्ष ज्या नेत्याची मुख्यमंत्रिपदाचा चेहरा म्हणून घोषणा करतील त्याला आम्ही पाठिंबा देऊ, अशी भूमिका आता त्यांनी घेतली आहे. खरे तर हासुद्धा दबावतंत्राचाच भाग आहे. सर्वसाधारणपणे आजपर्यंतच्या राजकीय कारकिर्दीचा विचार करता काँग्रेस कधीही निवडणुकीपूर्वी मुख्यमंत्रिपदाचा चेहरा जाहीर करत नाही. लोकसभा निवडणुकीमध्येही काँग्रेसने आतापर्यंत पंतप्रधानपदाचा उमेदवार कोण असेल याबाबत कधीही स्पष्ट किंवा अस्पष्ट सांगितलेले नाही. राहुल गांधी यांनी काँग्रेस पक्षात आघाडी घेतल्यापासून सर्वसाधारण कार्यकर्त्यांची आणि नेत्यांची मानसिकता अशीच आहे की, राहुल गांधी यांनी पंतप्रधानपदाचा चेहरा म्हणून निवडणुकीमध्ये उतरावे. पण काँग्रेसने आतापर्यंत तसे केलेले नाही. गेल्या काही कालावधीत झालेल्या विधानसभा निवडणुकींमध्येही काँग्रेस पक्षाने त्या त्या राज्यातील कोणत्याही नेत्याचे नाव अशा प्रकारे मुख्यमंत्रिपदाचा चेहरा म्हणून समोर आणले नव्हते. कारण काँग्रेस पक्षाची कामाची पद्धत पाहिली असता निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर नेहमीच्या पद्धतीने बैठकीत नेता निवड करून त्यावर हायकमांडचा शिक्कामोर्तब करून नंतरच मुख्यमंत्रिपदाचा शपथविधी केला जातो. साहजिकच जरी उद्धव ठाकरे यांनी पुन्हा एकदा मुख्यमंत्रिपदाची चर्चा सुरू केली असली, तरी काँग्रेस त्याला कितपत प्रतिसाद देईल याबाबत शंकाच आहे. दुसरीकडे, महाराष्ट्रातील महाविकास आघाडीचा प्रमुख घटक पक्ष असणार्या शरद पवार यांच्या पक्षालाही मुख्यमंत्रिपदाचा चेहरा जाहीर करण्यात कोणताही रस नाही. त्यांनी यापूर्वीच आम्हाला मुख्यमंत्रिपदामध्ये रस नाही अशी घोषणा केली आहे. साहजिकच मुख्यमंत्रिपदाचा चेहरा जाहीर करण्याचा चेंडू काँग्रेसच्याच कोर्टात आहे. कारण विधानसभा निवडणुकीचे निकाल जाहीर झाल्यावर मुख्यमंत्री कोण होईल असा निर्णय घेतला जाऊ शकतो, अशी भूमिकाही शरद पवार यांनी जाहीर केली आहे. तर काँग्रेसने ज्या पक्षाच्या जागा जास्त त्या पक्षाचा मुख्यमंत्री अशी भूमिका मध्यंतरी जाहीर केली होती. साहजिकच उद्धव ठाकरे यांना ज्या प्रकारे त्यांचे नाव मुख्यमंत्रिपदाचा चेहरा म्हणून जाहीर व्हावे असे वाटत आहे. त्याबाबत काँग्रेस पक्ष अनुकूल नाही हे उघड दिसत आहे. हरियाणा विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने काँग्रेस जेव्हा आपल्या पराभवाची कारणे तपासून पाहील तेव्हा मुख्यमंत्रिपदाचा चेहरा जाहीर न केल्यामुळे निवडणुकीत अपयश पत्करावे लागेल, असा निष्कर्ष समोर येऊ शकतो. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रापुरती काँग्रेस पक्षाची भूमिका बदलू शकते आणि काँग्रेस किंवा शिवसेना यापैकी एका पक्षातील नेत्याची मुख्यमंत्रिपदाचा चेहरा म्हणून घोषणा होऊ शकते, असे उद्धव ठाकरे यांना वाटत असावे. म्हणूनच या विषयावर दबाव वाढवण्यासाठी त्यांनी काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसने कोणताही उमेदवार जाहीर केला तरी आम्ही त्यांना पाठिंबा देऊ, अशी भूमिका घेतली आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे कोणत्याही राजकीय पक्षाने आपला मुख्यमंत्रिपदाचा उमेदवार कोण असेल याची घोषणा केल्यामुळे त्या पक्षाला विधानसभा निवडणुकीमध्ये चांगले यश मिळण्याची शक्यता जरी काही प्रमाणात वाढत असली तरी अशा निवडणुकीमध्ये जर अपयश मिळाले तर त्याची सगळी जबाबदारीसुद्धा या चेहर्यालाच घ्यावी लागते हे वास्तवही विसरून चालणार नाही. गेल्या लोकसभा निवडणुकीत नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील भारतीय जनता पक्ष जरी तिसर्यांदा विजयी झाला असला, तरी या पक्षाला काठावरील बहुमत मिळाले असल्याने त्याचे खापरही नरेंद्र मोदी यांच्यावरच फोडण्यात आले आहे, हेही विसरून चालणार नाही. याची जाणीव असल्याने काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस या दोन्ही पक्षांनी विधानसभा निवडणुकीत सामूहिकपणे सामोरे जाऊन सामूहिक नेतृत्वाला चेहरा म्हणून मतदारांसमोर आणावे अशी भूमिका घेतली आहे. हरियाणातील काँग्रेसच्या पराभवानंतर आणि उद्धव ठाकरे यांनी पुन्हा एकदा मुख्यमंत्रिपदाची चर्चा सुरू केल्यामुळे काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्या भूमिकेमध्ये काही बदल होतो का आणि महाविकास आघाडी आपला मुख्यमंत्रिपदाचा चेहरा म्हणून एखाद्या नेत्याच्या नावाची घोषणा करतात का, हे पाहणे निश्चितच औत्सुक्याचे ठरणार आहे.

# धर्म ग्लानिचे बदलते संदर्भ!

१४ ऑक्टोबर १९५६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी नाग लोकांच्या नागभूमीत, नाग नदीच्या काठी ऐतिहासिक धर्मांतर करून धम्मचक्र अनुप्रवर्तन केले. त्यानंतर दुसऱ्या दिवशी म्हणजे १५ ऑक्टोबर १९५६ रोजी उपस्थित लाखोंच्या जनसमुदायाला संबोधित करताना नवबौद्धांची कर्तव्य काय असतील? त्यांनी स्वाभिमान पूर्ण जीवन कसे जगावे? धर्माच्या प्रचार-प्रसारासाठी काय करावे? त्यासाठी आपल्या कमाईचा किती हिस्सा दान करावा? यासह धम्माच्या अनेक पैलूंवर प्रकाश टाकला. त्यापैकी सर्वात महत्त्वाचं म्हणजे त्यांनी धम्म ग्लानी का होतो? या विषयाला सुद्धा हात घातलेला दिसून येतो. त्यासाठी त्यांनी ग्रीक राजा मिलिंद यांचे उदाहरण दिलेले आहे. राजा मिलिंद (मीनांडर) हा वाद-विवाद पटू असल्यामुळे त्याला वाद-विवादाची मोठ्या प्रमाणात आवड होती. तो वाद-विवादासाठी अनेकांना आव्हान देत असे. त्याने वाद विवादामध्ये अनेकांचा पराजय सुद्धा केलेला होता.

एकदा त्याने बुद्धांनुयायांना चर्चेसाठी आव्हान केले, म्हणून बौद्धांनी अरहंत पदाला पोहोचलेले विद्वान भंते महाथेरो नागसेनास विनंती केली. त्यांनी बौद्धांची बाजू मांडत राजा मिलिंद सोबत वादविवाद केला. त्यांचा तो वादविवाद, ती चर्चा 'मिलिंद पन्ह' म्हणजेच मिलिंद प्रश्न या नावाने ग्रंथरूपाने प्रसिद्ध आहे. त्यांच्या या संवाद, वादविवाद तथा प्रश्नउत्तरांमध्ये मानवी जीवनाची उकल केलेली दिसून येते. त्यामधील तत्त्वज्ञानाला जागतिक कीर्तीच्या अनेक तत्ववेत्यांनी मान्यता दिलेली आहे. प्रश्न विचारणारा ज्ञानी आणि उत्तर देणारा महाज्ञानी कसा असतो, याचा तो उत्तम नमुना आहे. त्यामध्ये दोघांच्याही बुद्धीची प्रगाढता, विवेकाची सखोलता आणि तेवढीच व्यक्तिमत्त्वाची शालिनीता यासह एकमेकांप्रती असणारा आदरभाव द्वेष विरहित चर्चेसह प्रश्नोत्तरांचा तो आदर्श नमुना असल्याचे निर्विवाद प्रतीत होते. त्यामध्ये राजा मिलिंद भंतेंना धम्मा संबंधित प्रश्न विचारताना म्हणतो की, धर्मास ग्लानी का येते? त्यावेळी उत्तर देताना भंते नागसेनानी धर्म ग्लानीची तीन कारणे सांगितली. पहिले कारण म्हणजे, एखादा धर्मच कच्चा असतो, त्या धर्माच्या मूळ तत्त्वात गांभीर्य नसते. तो कालिक धर्म ठरतो व काळापुरता असा धर्म टिकतो. दुसरे कारण असे की, धर्मप्रसार करणारे लोक जर विद्वान नसतील तर धर्म ग्लानी होतो. ज्ञानी लोकांनी धर्मज्ञान सांगितले पाहिजे. वाद-विवाद करण्यास प्रचारक सिद्ध नसतील तर, धर्माला ग्लानी येते? आणि तिसरे कारण म्हणजे, धर्म व धर्माची तत्वे विद्वानांसाठी असतात. प्राकृत व सामान्य लोकांसाठी विहारे व मंदिरे असतात. तेथे जाऊन आपल्या श्रेष्ठ विभूतींचे ते पूजन करतात.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १३ ऑक्टोबर १९३५ ला धर्मांतराची घोषणा करून, तब्बल २१ वर्षांनी धर्मांतर केले. या प्रदीर्घ कालावधीमध्ये कित्येक स्थित्यंतरे झाली. अनेक धर्मगुरू, धर्मप्रचारक, धर्म संस्थापक त्यांना येऊन भेटले. आम्ही आपणासाठी पायघड्या अंथरल्याची त्यांनी साद घातली. इच्छित विचारले, मानसन्मान देऊन अमिष सुद्धा पुढ्यात ठेवले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मधल्या काळात सर्व धर्मांचा सखोल व तौलणिक अभ्यास करून प्रत्येक धर्माची काही कसोट्यांनी चाचपणी केली. ती म्हणजे, धर्म हा विज्ञानाशी विसंगत नको. तसे असल्यास तो लोकआदरास पात्र ठरत नाही. तो हास्यास्पद ठरून जीवन विषयक तत्त्वज्ञान रुजवण्यास असमर्थ ठरतो. याचा अर्थ धर्माचा संबंध कार्यकारणाशी म्हणजेच विज्ञानाची दृढतर असावयास पाहिजे. दुसरे म्हणजे, तो नीतिमत्तेवर आधारित असावा. तिसरे तो समाज धारणेस योग्य ठरावा म्हणून फक्त नीतीबद्ध असून चालत नाही, तर त्याने स्वातंत्र्य, समता व बंधुत्व या त्रयींच्या चाचणीत उतरले पाहिजे. तसेच त्याने दारिद्र्याचे गोडवे गाऊ नये, त्याचे उदात्तीकरण करू नये. गरीबी हे पूर्वजन्माचे फळ आहे, असे दारिद्र्याचे गोडवे गायले तर धर्माचा विपर्यास होतो. म्हणजे गुन्हेगारीला चीर स्थायी रूप प्राप्त करून देण्यासारखे होते, तर नरकाच्या कल्पनेप्रमाणे यातनायुक्त जीवनाला मान्यता देणे होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ज्या हिंदू धर्माचा त्याग करण्याचे योजले होते, तो वरील कसोट्यांना उतरणे शक्यच नव्हते. अन्यथा त्यांनी त्याचा त्यागच केला नसता. जगातील इतर काही धर्म एक ना दोन कसोट्यांमध्ये उतरले. परंतु बुद्धाचा एकमेव धम्मच फक्त संपूर्ण कसोट्यांना पूर्णपणे उतरताना दिसून आला. किंबहुना तोच धम्म समाज धारणेस पात्र असल्याचे त्यांच्या लक्षात आले.

बुद्ध धम्माची ध्येय उद्दिष्टे ही मानव केंद्रित असून, समता, स्वातंत्र्य, न्याय, बंधुत्व या महान मानवी मूल्याधारित समाज व्यवस्था निर्माण करणे हा मुख्य उद्देश आहे. तथागत बुद्धाने दुःखाचे अस्तित्व मान्य केले. तत्पूर्वी त्यांच्याप्रमाणेच इतरही काही तत्त्ववेत्यांनी दुःखाच्या अस्तित्वाला मान्यता दिल्याचे पुरावे मिळतात. परंतु दुःखाचे निराकरण करणारा मार्ग किंवा तत्वज्ञान कोणाकडेच नव्हते. ते केवळ तथागत बुद्धानेच संशोधित केले. त्यांनी संशोधित केलेल्या मार्गाने जर कोणी प्रवास केला तर, तो निब्बानाच्या मुक्कामाला पोहोचल्याशिवाय राहणार नाही, असा त्यांचा ठाम विश्वास होता. निब्बान म्हणजे काय? तर सदैव प्रज्वलित असणाऱ्या विकारांच्या (राग, द्वेष, मोह, जन्म, जरा, मृत्यू, दुःख, दौर्मनस्य, निराशा) ज्वालांवर निग्रह साधने. बुद्धाने असे विकार मुक्त, अनासक्त जीवन जगणाऱ्यांचा एक समूह निर्माण केला. ज्याचे नाव भिक्षु संघ असे आहे. त्या भिक्षु संघाच्या माध्यमातून मानव जातीसह संपूर्ण जीवसृष्टीची त्यांनी काळजी वाहिली. करुणेच्याही पलीकडे, त्यांनी मैत्री भावना विकसित केली. त्यामुळे धम्म लोकआदरास पात्र ठरला. अनेकांनी त्याला अंगीकारले. अनेक राज्यांनी त्याला आश्रय दिला, त्यामुळे तो राजधर्म ठरला. परिणामत: त्याने साता-समुद्रापार झेप घेतली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धर्मांतर करताना विविध धर्माच्या विविध पैलूंची तपासणी केली. अन्यथा आगीतून निघून फुफाट्यात पडल्यागत दशा व्हायला नको. अशी त्यांची धारणा असल्यामुळे भारत भूमीतूनच उदयाला आलेला, जो धर्म नसून धम्म आहे. ज्यामध्ये ईश्वर, आत्मा, पुनर्जन्म, कर्मकांड याला अजिबात थारा नाही. जो अनुभवावर आधारित असून बुद्धीवादी आहे. जो अपौरुषयतेचा कधीच दावा करत नाही. जो येही पस्सीको (ये आणि पहा) असा आहे. अशा बुद्धाच्या धम्माला त्यांनी प्राधान्य दिले.

हा देश फक्त बुद्धाच्या तत्त्वज्ञानानेच तरू शकतो, जीवनकलहात टिकाव धरू शकतो. अन्यथा तो रसातळाला जाण्यास वेळ लागणार नाही. अशी त्यांची पक्की खात्री होती.

जेव्हा धर्मांतरापूर्वी त्यांना संविधान साकारण्याची संधी मिळाली, तेव्हा त्यांनी समाज सुव्यवस्थेसाठी आवश्यक असणाऱ्या बाबींचा विचार केला. समाजसुव्यवस्था टिकण्यासाठी नीतिमत्तेची आणि कायद्याची गरज असते. बहुसंख्यांक लोक नीतिमत्तेने वागतात, तर इतरांसाठी कायदा असतो. कायद्याने त्यांचा बंदोबस्त करता येतो. म्हणून दोन्ही बाबींचा सुरेख संगम संविधानामध्ये दिसून येतो.

लोकशाही प्रस्थापित करण्यासाठी संविधान हे एक साधन आहे. समता, स्वातंत्र्य, बंधुत्व, न्याय या मानवी मूल्याधारित समाज व्यवस्था निर्माण करणे हे लोकशाहीचे अंतिम ध्येय असते. त्यासाठी संविधान हे सर्वोत्तम तथा प्रभावी साधन आहे यात कसलीही शंका नाही. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर २५ नोव्हेंबर १९४९ च्या संविधान सभेतील आपल्या शेवटच्या भाषणात म्हणतात की, समता, स्वातंत्र्य, न्याय, बंधुत्व ही मानवी मूल्य मी फ्रेंच राज्यक्रांती पासून घेतली असे कोणीही समजू नये. तर ती; मी माझे गुरु तथागत गौतम बुद्धाकडून घेतलेली आहेत. पुढे ते असेही म्हणतात की, पूर्वीही भारत देशात लोकशाही नांदत होती. एकेकाळी भारत देश गणराज्यांनी भरगच्च होता. भिक्षु संघाच्या ज्या सभा चालायच्या ते सर्व संसदेचं दुसरं रूपच होतं. संघाची सर्व कारवाई ही संसदेच्या कारवाईप्रमाणे चालत होती.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आयुष्याच्या अंतिम टप्प्यातील त्यांनी देशाला दिलेली सर्वोत्तम भेट म्हणजे, भारतीय संविधान आणि तथागत बुद्धाचा धम्म होय. जे एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. दोघांचेही अंतिम ध्येय मानवी जीवनातील दुःख नष्ट करणे हेच आहे. धम्माने आपले उद्दिष्ट साध्य करण्यासाठी पंचशील अष्टांगिक मार्ग व दहा पारमिता दिल्या. तर संविधानाने मूलभूत हक्क-अधिकार, निती-निर्देशक तत्व व मूलभूत कर्तव्य दिली आहेत. बुद्धाने कालबाह्य विचार काढून फेकण्याचे स्वातंत्र्य दिले. तर संविधानाने मानवी व्यक्तिमत्त्वाला न्यूनता आणणाऱ्या विचारांवर कायमची बंदी घालून, नव्याने तसे कायदे करण्याचे अधिकार नाकारले. सोबतच नवीन पिढीचे बदलते विचार, समस्या, मागण्या, अपेक्षा पूर्ण करण्यासाठी एखादा विचार, कायदा अपुरा पडत असेल तर, त्याला निरसीत करणे, फेरबदल करणे किंवा नव्याने तयार करण्याचे अधिकार संसदेला बहाल केले.

म्हणजेच धम्माचे प्रतीरूप असलेली लोकशाही प्रस्थापित करण्याचे परमोच्च साधन म्हणजे संविधान. त्याचीच आज प्रताळणा होताना दिसत आहे. त्याला हादरे देण्याचे काम जोरात सुरू आहे. त्याला बदलण्यासाठीच आम्ही सत्तास्थाने प्राप्त केली आहेत. त्याला ग्लानी आणणे हेच आमचे अंतिम ध्येय आहे. असे निर्भीड बोलणाऱ्यांची संख्या आज वाढताना दिसत आहे. धम्माला ग्लानी आली तर मानव जात दुःखी होऊन वेळप्रसंगी ती नष्टही होऊ शकते. तशी संविधानाला म्हणजेच लोकशाहीला ग्लानी आली तर, गुलामी, विषमता, उच्चनीचता, द्वेष, मत्सर, तिरस्कार आणि अन्याय पसरून मानवी मूल्य रसातळाला जातील. त्यामुळे विषमतावाद्यांचं फावेल, म्हणून संविधान अंमलबजावणीचा लोकाग्रह, ही चळवळ जोमाने उभी राहावी. अन्यथा मनुस्मृतीचे राज्य येण्यास वेळ लागणार नाही.

*******

भिमराव परघरमोल
लेखक, व्याख्याता तथा अभ्यासक
फुले, शाहू, आंबेडकरी विचारधारा
तेल्हारा जि. अकोला

# घटस्थापना- कलशस्थापना: नवरात्रोत्सव माहिती विशेष

आपल्या भारत देशात अनेक सण साजरे केले जातात, त्यापैकीच एक सण म्हणजे नवरात्र होय. हा सण भारतातील विविध भागात मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. अश्विन महिन्याच्या पहिल्याच दिवशी नवरात्र उत्सवाला सुरुवात होते. नवरात्रीच्या पहिल्या दिवशी सार्वजनिक मंडळामध्ये देवीच्या मूर्तीची स्थापना करतात. हिंदू धर्मग्रंथांमध्ये नवरात्रीच्या सुरुवातीला विशिष्ट वेळेत घटस्थापना विधी करण्यासाठी चांगले नियम आणि मार्गदर्शक तत्त्वे आहेत. घटस्थापनेमध्ये देवीची पूजा समाविष्ट आहे, जे योग्य वेळी केली पाहिजे. शास्त्रांनी चेतावणी दिली आहे, की जर हा विधी चुकीच्या वेळी केला गेला तर यामुळे देवीला क्रोध येऊ शकतो. घटस्थापना करण्यासाठी अमावस्या आणि रात्रीची वेळ टाळावी. प्रतिपदा चालू असताना दिवसाचा पहिला एक तृतीयांश घटस्थापना करण्याचा सर्वात शुभ काळ आहे. जर कोणत्याही कारणामुळे ही वेळ उपलब्ध नसेल, तर ती अभिजित मुहूर्ताच्या वेळी करता येते. घटस्थापनेदरम्यान नक्षत्र चित्र आणि वैधृती योग टाळावेत, जरी ते प्रतिबंधित नसले तरी. प्रतिपदा चालू असताना हिंदू मध्यान्ह आधी घटस्थापना करणे सर्वात महत्वाचे आहे, असे शास्त्रात सांगितले आहे.

यावर्षी दि.१५ ऑक्टोबर २०२३पासून शरद नवरात्री सुरू होईल. शरद नवरात्री सप्टेंबर-ऑक्टोबर महिन्यात साजरी केली जाते. दुर्गादेवीची पूजा करणे हे भक्तांचे मुख्य कार्य आहे. नवरात्री म्हणजे देवी शारदा, दुर्गा पूजेचा पवित्र सण आहे. नवरात्रीच्या नऊ दिवसांमध्ये देवीच्या विविध रूपांची पूजा केली जाते. घटस्थापना हा नवरात्रीचा पहिला दिवस म्हणजेच नवरात्रीच्या नऊ दिवसांच्या उत्सवाचा आरंभ आहे. घटस्थापना हा नवरात्रीच्या दरम्यान केला जाणारा एक अत्यंत महत्वाचा विधी आहे. कलश स्थापना हे घटस्थापनेचे दुसरे नाव आहे. दुपारी, सूर्योदयानंतर आणि रात्रीची वेळ म्हाणजेच सोळा घाटीच्या पलीकडे कोणत्याही वेळी घटस्थापनेसाठी मनाई आहे. नवरात्री हा हिंदू सण आहे आणि लोक हा सण मोठ्या उत्साहाने साजरा करतात. शक्तीची देवी म्हणजेच दुर्गा देवी यांच्या स्मरणार्थ नवरात्री हा एक भव्य उत्सव आहे. या सणामध्ये देवी दुर्गाची नऊ दिवस वेगवेगळ्या भूमिकेत पूजा केली जाते. देवी दुर्गा नवरात्रीच्या दरम्यान नऊ वेगवेगळ्या रूपात पृथ्वीवर आशीर्वाद देते. देवीचा आशीर्वाद आपल्याला नवरात्रीला दुर्गा, लक्ष्मी आणि सरस्वतीच्या रूपात दिला जातो. नवरात्रीचा पहिला दिवस घटस्थापना केली जाते.

नवरात्रीचा शाब्दिक अर्थ आहे, नऊ धार्मिक रात्रींचा उत्सव किंवा सण होय. या नऊ दिवसांमध्ये देवी दुर्गास तिच्या तीन सर्वोच्च रूपांमध्ये पूजल्या जातात. शारदीय नवरात्रीच्या पहिल्या दिवशी कलश स्थापनेने देवी दुर्गाची पूजा सुरू होते. घटस्थापना पूजेसाठी आवश्यक गोष्टी अशा- सप्त धान्य पेरण्यासाठी मातीचे भांडे-कलश, सप्त धान्य पेरणीसाठी स्वच्छ आणि चांगली माती, सप्त धान्य किंवा सात वेगवेगळ्या धान्यांचे बियाणे, पाणी, सुगंधी अत्तर, पवित्र धागा- माऊली, सुपारी, नाणी, विड्याची पाने, आंब्याची पाने, तांदूळ- अक्षता, नारळ, दोन लाल कापड, फुलांच्या माळा दोन किंवा फुले, दुर्वा- गवत, देवी दुर्गाचे चित्र-मूर्ती, धूप, दिवा, तूप, कापसाची वात, फळे, मिठाई, पूजा थाळी- आरती, हळद, कुंकू, गुलाल, बुक्का, देवीसाठी चुनरी आदी. याशिवाय दोन नारळ एक कळसावर ठेवण्यासाठी आणि एक देवीची ओटी भरण्यासाठी ओटी भरण्यासाठी थोडेसे गहू, सतीच वान, आरतीसाठी निरंजन, निरंजनामध्ये तूप आणि वाती, समोर लावण्यासाठी समई व समईमध्ये तेल आणि वाती याशिवाय खडीसाखरेचा प्रसाद आणि घटाला बांधण्यासाठी झेंडूच्या पानाची माळ आणि घटाच्या भोवती काढण्यासाठी रांगोळी हे सर्व साहित्ये घट सजविताना आवश्यक आहेत. कलश असे भरतात- खुल्या तोंडाचे मातीचे भांडे घेऊन भांड्याच्या अर्ध्या भागापर्यंत माती भरतात. नंतर धान्याच्या बिया घालतात. बियांच्या वर माती घालतात. पुन्हा धान्याच्या बिया घातल्या जातात. मग मातीचा तिसरा आणि शेवटचा थर भांड्यात पसरवला जातो. आवश्यक असल्यास माती सेट करण्यासाठी भांड्यात थोडे पाणी घातले जाते. यानंतर कलशावर पवित्र धागा बांधतात. कलश- भांडे मानेपर्यंत पाण्याने भरावे लागते. कलशमध्ये सुपारी, दुर्वा गवत, सुगंधी अत्तर घातले जाते. कलशमध्ये काही नाणी ठेवावी लागतात. कलशच्या काठावर झाकणाने झाकण्यापूर्वी पाच आंब्याची पाने ठेवली जातात. मग कलशमध्ये अक्षता ठेवाव्या लागतात. एवढे झाल्यावर नारळ घेऊन ते लाल कपड्यात गुंडाळतात. पवित्र धाग्याने नारळ आणि लाल कापड बांधले जाते आणि ते कलशच्या वर ठेवले जाते. शेवटी कलश हा तयार केलेल्या धान्याच्या भांड्यावर मध्यभागी ठेवला जातो. त्यानंतर पुष्पहार, दिवा, धूप काठी, फळे, गोड आणि सुगंध ठेवून पूजा थाळी तयार करतात.

कलश आणि धान्याच्या भांड्याला पहिली प्रार्थना करून देवी दुर्गाचे आवाहन केले जाते आणि तिला विनंती करतात, की आपली प्रार्थना स्वीकारावी आणि नऊ दिवस कलशमध्ये राहून आम्हाला आशीर्वाद द्यावे. नावाप्रमाणे पंचोपचार पूजा पाच पूजा वस्तूंसह केली जाते. दिवा लावून कलशाभोवती प्रदक्षिणा घातली जाते. धूप लावून कलशाभोवती गोल फिरतात. कलशवर फुलांची माला ठेवून फुले अर्पण केली जातात. शेवटी पंचोपचार पूजेची सांगता करण्यासाठी नैवेद्य म्हणजेच कलशला फळ आणि गोड पदार्थ अर्पण करतात. कलशवर अत्तर शिंपडून देवतेला सुगंध अर्पण केले जाते. एका पाटावर किंवा खाली लाल कापड ठेवून दुर्गा देवीचा फोटो किंवा मूर्तीवर चुनरी ठेवतात. देवी दुर्गाला प्रार्थना करतात. तिला नऊ दिवस त्या जागी राहायला विनंती केली जाते. देवी दुर्गाच्या फोटो किंवा मूर्तीभोवती दिवा आणि धूप फिरवतात. दुर्गा देवीला पुष्पहार घातला जातो. दुर्गा देवीला गोड आणि फळ अर्पण करतात. कलश आणि दुर्मिळ भांडे देवी दुर्गाजवळ ठेवले जाते. प्रार्थना करत दररोज नऊ दिवस फक्त भांड्यावर पाणी शिंपडून नऊही दिवस पूजा करतात. कोणी देव-देवींच्या कथा वाचतात आणि सकाळी व संध्याकाळी प्रार्थना करतात. शक्य असल्यास ताजी फळे आणि गोड पदार्थही नऊ दिवस अर्पण करतात.

नवरात्रीतील नऊ दिवस सर्वजण मोठ्या श्रद्धेने देवीची पूजा करतात. सार्वजनिक मंडळाच्या ठिकाणी भजन, कीर्तन तसेच अनेक देखाव्यांचे आयोजन केले जाते. ते बघायला लोक एकत्रित येतात. बरेच लोक नऊ दिवस उपवास करून देवीचे व्रत पूर्ण करतात. नवरात्रीचे नऊ दिवस देवीला वेगवेगळ्या रंगांच्या साड्या नेसवल्या जातात. देवीप्रमाणे सर्व स्त्रियाही नऊ दिवस वेगवेगळ्या रंगाच्या साड्या नेसतात. नवरात्रीमध्ये सर्वत्र सजावट पाहायला मिळते. नाना दृश्यांसह मोठे-मोठे मंडप बघायला मिळतात. विविध सार्वजनिक मंडळातर्फे सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. स्त्रिया, पुरुष तसेच लहान मुलं दांडिया, गरबा खेळतात. विविध स्पर्धांमध्ये सहभागी होतात. या नऊही दिवशी सर्वत्र उत्साहाचे वातावरण असते. कलकत्ता, गुजरात, बिहार, आसाम यांमध्ये या सणाला वेगळेच महत्व आहे. तेथे मोठ्या प्रमाणात दुर्गापूजाचे आयोजन केले जाते. देवीने राक्षस महिषासुराचा वध केला म्हणून देवीला महिषासुरमर्दिनी असे सुद्धा म्हटले जाते. दहाव्या दिवशी देवीच्या मूर्तीचे विसर्जन केले जाते या दिवसाला दसरा असेही म्हणतात. हा सण एकमेकांना जवळ आणतो. वाईट गोष्टीवर मात करून नवीन गोष्टी आत्मसात करण्याचा हा सण आहे. खरे तर स्त्रीचा सदैव सन्मान करणे व राखणे याहून पुण्यप्रतापी नवरात्रोत्सवाची दुसरी घटस्थापनाच नाही; हे विसरून कसे चालेल?

!! आदिमाया आदिशक्तीच्या घटस्थापना निमित्ताने समस्त भक्तांना शारदोत्सवाच्या हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

**********

श्री एन. के. कुमार, से. नि. अध्यापक.
पोटेगावरोड, पॉवर स्टेशनच्या मागे, गडचिरोली.
मधुभाष क्रमांक-
७७७५०४१०८६.

# कांशीराम यांना भारतरत्न देण्यात यावे अशी पुन्हा मागणी.

बहुजन समाज पार्टी, कामठी शहरा तर्फे २१ व्या सदीचे युगपुरुष बामसेफ,डीएसफोर,व बहुजन समाज पार्टीचे संस्थापक बहुजन नायक मान्यवर कांशीराम यांच्या १८ व्या स्मृतीदिनानिमित्त जयस्तंभ चौक स्थिर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळा परिसर येथे अभिवादन सभा घेण्यात आली. बहुजन नायक मान्यवर कांशीराम साहेबांच्या अभिवादन सभेत मार्गदर्शन करतानां बसपा नागपूर जिल्हा प्रभारी किशोर गेडाम उर्फ भाऊसाहेब म्हणाले मान्यवर कांशीराम यांनी बहुजन समाजाला सामाजिक,आर्थिक व राजनीतिक संकटातून बाहेर काढले. देशातल्या प्रत्येक वर्गाच्या लोकांमध्ये आत्मविश्वास निर्माण केला.जे ग्रामपंचायतचे मद्ये सदस्य बनू शकत नव्हते त्यांना आमदार,खासदार,मंत्री बनवलं ते पुढे म्हणाले मान्यवर कांशीराम यांनी भारत देशामध्ये समाज परिवर्तनाचे काम केले आहे म्हणून भारत देशामध्ये खऱ्या अर्थाने कांशीराम हे भारतरत्न या उपाधीचे खरे हकदार आहेत म्हणून भारत सरकारने बहुजन नायक कांशीराम यांना मरणोप्रांत भारतरत्न हा किताब देऊन सन्मानित करायला पाहिजे.बसपा नागपूर जिल्हा प्रभारी किशोर गेडाम उर्फ भाऊसाहेब यांनी मांगणी केली.



या कार्यक्रमाला प्रामुख्याने स्टार प्रचारक मुस्लिम नेते मोहम्मद शफी सहाब, कामठी महिला संघाच्या नेत्या विद्याताई भिमटे,विधानसभेचे प्रभारी इंजि. विक्रांत मेश्राम यांनीही बहुजन नायक मान्यवर कांशीराम साहेबांच्या जीवन चरित्रावर समयोचित भाषणे केले.कार्यक्रमाचे आभार कामठी शहराचे अध्यक्ष विनय ऊके यांनी केले. या अभिवादन कार्यक्रमात विधानसभेचे उपाध्यक्ष अनिल कुरील,महिला नेते सुधाताई रंगारी,माजी विधानसभा अध्यक्ष नागसेनजी गजभिये,विकास रंगारी, निशिकांत टेंभेकर,विशाल गजभिये,दिपालीताई गजभिये,रंजनाताई मेश्राम,राजन मेश्राम,अमित भैसारे,गुरुपालजी बोरकर,जैस्वाल साहब,भोयर साहेब व अन्य कार्यकर्ते प्रामुख्याने उपस्थित होते.

*******

किशोर गेडाम -
९९७०३४५०४४,
कामटी नागपूर.

# कोळगाव चा शेतकरी सुनिल वडजकर शासनाच्या 'रेशीमरत्न' पुरस्काराने सन्मानित






रेणापूर :- रेणापूर तालुक्यातील शेतकरी सुनिल वडजकर या रेशीम उत्पादक शेतकऱ्यास महाराष्ट्र शासनाच्या रेशीमरत्न पुरस्काराने सोमवारी अमरावती येथे सन्मानित करण्यात आले. या निवडीबद्दल या शेतकऱ्याचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. रेणापूर तालुक्यातील कोळगाव येथील शेतकरी सुनिल वडजकर या शेतकऱ्याने मागील काही वर्षांपासून रेशीम उत्पादनात भरीव कामगिरी केली. त्याचबरोबर त्यांनी रेणापूर तालुक्यातील व तालुक्याच्या बाहेरील अनेक शेतकऱ्यांना रेशीम शेती करण्यासाठी निःशुल्क माहिती देऊन रेशीम शेती करण्यासाठी प्रोत्साहित केले. यामुळे रेणापूर तालुक्यात व परिसरात रेशीम शेतीच्या माध्यमातून कोष उत्पादनात भरीव कामगिरी करून आर्थिक स्थैर्य प्राप्त केले. त्यामुळे महाराष्ट्र शासनाने सुनिल वडजकर यांची २२-२३ च्या रेशीमरत्न पुरस्कारासाठी निवड करण्यात आली होती. हा पुरस्कार अमरावती येथे पालकमंत्री चंद्रकांत पाटील, खासदार डॉ. अनिल बोंडे, नागपूर येथील रेशीम संचालनायाचे उपसंचालक डॉ. महिंद्र ढवळे आदी मान्यवरांच्या हस्ते सुनिल वडजकर पती पत्नीचा सत्कार करण्यात आला. या पुरस्काराबद्दल शेतकरी सुनिल वडजकर यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# नवी मुंबईत शिवसेनेला खिंडार विजय नाहटा यांनी तुतारी घेतली हाती



नवी मुंबई / प्रतिनिधी :- शिवेसेनचे लोकप्रिय उपनेते माजी आयुक्त विजय नाहटा हे गेली अनेक वर्षांपासून एकनाथ शिंदे यांच्या सोबत शिवसेनेचे काम करीत होते,विजय नाहटा फाऊंडेशन मार्फत बेलापूर मतदार संघात छत्री वाटप, वह्या वाटप, महिलांच्या आरोग्यासाठी शिबिर त्यांना मोफत चेकअप,तरुण तरुणी साठी रोजगार मेळावा असे विविध उपक्रम राबवून नाहटा साहेब घरोघरी परिचित झाले, परंतु इतकी मेहनत घेऊन सुद्धा त्यांना बेलापूर विधानसभेचे तिकीट मिळत नसल्याने,महायुतीने गणेश नाईक यांना तिकीट दिल्याने नाराज होऊन शेवटी शरद पवार यांच्या राष्ट्रवादी पक्षात प्रवेश करीत आहेत. त्यांच्या पक्ष प्रवेशामुळे राष्ट्रवादी काँग्रेस मजबूत होणार आहे,परंतु शिवसेना दुबळी होईल हे तेवढंच खर आहे. विजय नाहटा यांनी कमी अवधी मध्ये शिवसेनेला बळकट केले होते,हजारो कार्यकर्ते शिवसेनेत प्रवेश करीत होते,खासदार नरेश म्हस्के यांना निवडणून आणण्यात नाहटा साहेब यांचा सिहांचा वाटा होता.

# तुटलेली कॉम्पॅक्ट पावडर पुन्हा एकदा सेट करण्यासाठी 'या' सोप्या टिप्स, पावडर होईल आधी सारखीच

सर्वच महिला आणि मुलींना मेकअप करायला खूप आवडतो. मेकअप केल्यानंतर चेहऱ्याचे सौदंर्य अतिशय खुलून दिसते. मेकअप करण्यासाठी वेगवेगळ्या ब्रँडचे मेकअप प्रॉडक्ट वापरले जातात.त्यामध्ये लिपस्टिक, मस्कारा, आयशॅडो, लूज पावडर, आयलायनर इत्यादी प्रॉडक्ट मेकअप करण्यासाठी लागतात. पण अनेकदा मेकअप प्रॉडक्ट खाली पडल्यानंतर किंवा कुठेही टाकून ठेवल्यामुळे खराब होण्याची शक्यता असते. मेकअप करताना प्रत्येक स्त्रीला बेसिक गोष्टी माहिती असणे गरजेचे असते. सर्वच महिलांच्या मेकअप किटमध्ये मेकअप करताना लागणारी कॉम्पॅक्ट पावडर ही असतेच. मेकअप केल्यानंतर पावडर लावली नाहीतर मेकअप व्यवस्थित सेट होत नाही. बाजारात अनेक वेगवेगळ्या ब्रँडचे आणि प्रकारच्या कॉम्पॅक्ट पावडर उपलब्ध आहेत. तसेच काही महिला संपूर्ण मेकअप किट विकत घेतात त्यामध्ये सर्व प्रकारच्या मेकअप करण्यासाठी लागणाऱ्या वस्तू उपलब्ध असतात. पण काही वेळा कॉम्पॅक्ट पावडरची लहानशी डब्बी हातातून पडल्यानंतर किंवा इतर काही कारणांमुळे खाली पडल्यानंतर फुटून जाते. खाली पडल्यानंतर त्यातील पावडरचे बारीक बारीक तुकडे होऊन जातात. कॉम्पॅक्ट पावडर वापरण्यायोग्य राहत नाहीत. त्यामुळे आज आम्ही तुम्हाला तुटलेली कॉम्पॅक्ट पावडर पुन्हा एकदा सेट करण्यासाठी आम्ही तुम्हाला काही सोप्या स्टेप्स सांगणार आहोत. या स्टेप्स फॉलो करून तुम्ही पुन्हा एकदा तुटलेली कॉम्पॅक्ट पावडर सेट करू शकता. तुटलेली कॉम्पॅक पावडर 'या' पद्धतीने करा सेट: तुटलेली कॉम्पॅक पावडर स्वच्छ करून सगळ्यात आधी प्लेट मध्ये किंवा झिप बॅगमध्ये काढून घ्या. यामुळे पावडर पुन्हा एकदा खाली पडणार नाही.

# सिद्धार्थ हाउसिंग सोसायटी येथील सिद्धार्थ बुद्ध विहार बांधकाम व रंगकामाचा शुभारंभ







लातूर - लातूर शहरातील सिद्धार्थ हाऊसिंग सोसायटी येथील सिद्धार्थ बुद्ध विहार तळमजल्याचे रंगकाम व दुसऱ्या मजल्यावरील गिलावा बांधकामाचा शुभारंभ सिद्धार्थ हाउसिंग सोसायटीचे चेअरमन विठ्ठल जाधव यांच्या हस्ते नारळ फोडून करण्यात आला.यावेळी परिसरातील नागरिक भूमी कन्स्ट्रक्शनचे धनराज काळे,महापालिकेचे कर्मचारी आदी उपस्थित होते.

# तरुणींनी आत्मभान जागृत ठेवून जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात उत्तुंग भरारी घ्यावी सामाजिक कार्यकर्त्या शैलजा वारद

लातूर :- तरुणींनी आत्मभान जागृत ठेवून जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात उत्तुंग भरारी घ्यावी असे प्रतिपादन शैलजा वारद यांनी केले .त्या येथील महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात आयोजित शारदीय नवरात्र महोत्सवात उद्घाटक म्हणून बोलत होत्या. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.संजय गवई हे होते तर विचारमंचावर कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. संजय पवार ,पर्यवेक्षिका प्रा. वनिता पाटील ,राजनंदा कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्या सुष्मिता पाटील, युवती मंचाच्या अध्यक्षा डॉ शीतल येरूळे ,सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. रत्नाकर बेडगे आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रारंभी जगतज्योती महात्मा बसवेश्वरांच्या प्रतिमेचे पूजन आणि दीप प्रज्वलन झाले. पुढे बोलताना शैलजा वारद म्हणाल्या की ,आदिशक्तीची उपासना म्हणजे धैर्य ,शक्ती निर्णय क्षमता, सदसद विवेकाची जागृती याकरिता केली जाते तरुणींनी नवरात्रात नवरंगी जीवन जगत सकारात्मक ऊर्जा निर्माण करून समाजासाठी, देशासाठी विधायक कार्य करण्याचा प्रयत्न करावा असेही त्या म्हणाल्या. कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी सुष्मिता पाटील म्हणाल्या की, तरुणींनी स्वतंत्र, स्वावलंबी, जबाबदारीपूर्ण असे जीवन जगणे आदिशक्तीच्या उपासनेतून शिकली पाहिजे. आज जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात स्त्रियांनी भरीव अशी कामगिरी केली आहे त्यांच्या कार्याचे स्मरण करून आपणच आपल्या जीवनाचे शिल्पकार समजून जीवन समृद्ध केले पाहिजे असेही त्या म्हणाल्या. आपल्या अध्यक्षीय समारोपात डॉ. संजय गवई म्हणाले की, उत्सव हे मानवी जीवनात चैतन्य निर्माण करणारे असतात. या निमित्ताने लोकशक्ती एकत्र होऊन समाजामध्ये एकत्वाची भावना निर्माण होते असेही ते म्हणाले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक पर्यवेक्षिका प्रा.वनिता पाटील यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. कल्पना गिराम, प्रा. रूपाली हलवाई यांनी केले तर आभार डॉ. अश्विनी रोडे यांनी मानले . कार्यक्रमाचे औचित्य साधून उत्तम सादरीकरण करणाऱ्या अमृता डांगे, उमा पवार, संजना पारडे, कदम वैष्णवी, सायली कांबळे, स्नेहल मिसाळ, शेख अफसिन, पूजा कांबळे या विद्यार्थिनी व विजेत्या संघांना जगज्योती महात्मा बसवेश्वरांचे प्रतिमा देऊन सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाच्या यशस्वीते करिता प्रा. माधुरी सरपे, वाणिज्य विभाग समन्वयिका प्रा. वैशाली जयशेट्टे, प्रा. विष्णू ततापुरे ,रमेश राठोड , आनंद खोपे, राजू बोडके ,संतोष राठोड यांनी परिश्रम घेतले.



# भारतीय दलित पँथरच्या वतीने शनिवारी जळकोटमध्ये 'जागर' आरक्षण व संरक्षणाचा कार्यक्रमाचे आयोजन

लातूर :- भारतीय दलित पँथरच्या वतीने, शनिवार, दि. १२ ऑक्टोबर २०२४ रोजी जळकोट येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर सकाळी ११ वाजता 'जागर' आरक्षण व संरक्षणाचा, लढा समाजहिताचा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. माझा समाज माझं संघटन या उपक्रमांतर्गत सदर कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमास प्रमुख मार्गदर्शक म्हणून भारतीय दलित पँथरचे प्रदेश कार्याध्यक्ष संजयभाऊ कांबळे उपस्थित राहणार आहेत. यावेळी प्रमुख व्याख्याते म्हणून दलित पँथरचे प्रदेश अध्यक्ष एड. रमेशभाई खंडागळे, प्रदेश उपाध्यक्ष एड. शिवाजी आदमाने ,प्रदेश प्रवक्ता एड. विजय जाधव यांची उपस्थिती राहणार आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बौद्ध धम्म प्रचारक प्रा. बालाजी आचार्य राहणार आहेत. यावेळी जिल्हा संयोजक सर्वश्री सुनील क्षीरसागर, धम्मानंद घोडके, राजीव कांबळे दावणगावकर यांचीही उपस्थिती राहणार आहे. या कार्यक्रमाचे संयोजक संग्राम गोविंदराव कदम हे आहेत. यावेळी भिम शाहिरांचा गीत गायनाचा प्रबोधनात्मक कार्यक्रमही होणार असून त्यामध्ये स्नेहा खंडागळे, राजरत्न सोनवणे ,धम्मपाल सावंत, नितीन कांबळे, धम्मजीत तिगोटे आपली गीते सादर करणार आहेत. डॉ. बाबासाहेबांची लेकरे शिक्षण घेऊ नये, यासाठी शिक्षणाचे खाजगीकरण केलं गेलं आहे. अडचणींवर मात करून शिकले तर सरकारी नोकरीत जाऊ नये म्हणून त्याचे खाजगीकरण करून नोकर भरती बंद केली. महिलांवर, लहान मुलींवर , युवकांवर, निष्पाप लोकांवर अन्याय अत्याचार करण्याचे प्रकार दिवसेंदिवस वाढले आहेत. अन्याय करणाऱ्याना अभय दिले जात असून पिडीतांवर खोटे गुन्हे दाखल करून तुरुंगात टाकले जात आहे. या बाबींविरुद्ध संघर्ष करण्यासाठी एकजूट होऊन स्वाभिमानाने लढा देण्यासाठी हा अभिनव उपक्रम राबविला जात आहे. या कार्यक्रमास समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# प्रा.डॉ.महादेव सुवर्णकार यांच्या संशोधनास यु-के कडून पेटेंट ;विविध ठिकाणी सत्कार



केज/प्रतिनिधी :- केज येथीलबाबुरावजी आडसकर महाविद्यालय व शिवाजी विद्यापीठ येथील प्राध्यापकांच्या संशोधनास यु-के सरकारचे पेटेंट बाबुरावजी आडसकर महाविद्यालयातील प्रा.डॉ. महादेव सुवर्णकार व रसायनशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथील प्रा. डॉ. के. एम. गरडकर, डॉ. नाना गावडे व डॉ. संतोष बाबर, यांच्या संशोधनातून जलशुद्धीकरणासाठी वापरण्यात येणारे नवीन उपकरण हे नॅनो मटेरियल लॅबोरेटरी मध्ये तयार करण्यात आलेले आहे. त्या उपकरणासाठी त्यांना यु-के सरकार मार्फत पेटंट मंजूर झालेले आहे. या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे भाऊसाहेब पाटील अध्यापक महाविद्यालयात प्रा.डॉ.महादेव सुवर्णकार यांचा सत्कार करण्यात आला.यावेळी डॉ. हनुमंत सौदागर,प्रा.डॉ.नागेश कराळे, प्रा.डॉ. श्याम सरसरे,प्रा.अशोक घोडके,सुजित नाईकवाडे आदींच्या हस्ते सत्कार करण्यात आला. सध्या जलद गतीने वाढणारे औद्योगिकीकरण आणि त्या मध्ये रसायने आणि नैसर्गिक संसाधनांचा व्यापक वापर केला जातो. कंपनी मधून बाहेर पडणारे नॉन बायोडिग्रेडेबल सेंद्रिय पदार्थ असलेले औद्योगिक सांडपाणी जे सरळ पुढे नद्या, नाले किंवा समुद्राच्या पाण्यात सोडले जातात.

त्या मुळे जलप्रदूषणासारख्या प्रमुख जागतिक समस्या डोके वर काढत आहेत. अशा समस्या टाळण्यासाठी औद्योगिक सांडपाणी प्रक्रिया करून शुद्ध करणे गरजेचे आहे. औद्योगिक सांडपाणी शुद्ध करण्या साठी नॅनोमटेरियल फोटोकॅटलिस्ट हे एक प्रभावी आणि आर्थिक दृष्ट्या सोईस्कर पर्याय आहे. प्रा डॉ. के.एम. गरडकर, प्रा. डॉ. महादेव सुवर्णकार आणि सहकार्यांनी नॅनोमटेरियल फोटोकॅटलिस्ट मध्ये बरेच आंतरराष्ट्रीय शोध निबंध प्रसिद्ध केले आहेत. भविष्यात देखील सोप्या हरित पद्धतीने आणि सूर्य प्रकाशामध्ये काम करणारे नॅनोमटेरियल फोटोकॅटलिस्ट तयार करून पर्यावरणाची हानी टाळता येईल असे मत सुवर्णकार यांनी व्यक्त केले.

# जुईनगर ठिकाणी भव्य धम्म रॅली संपन्न

नवी मुंबई /प्रतिनिधी :- सालाबादप्रमाणे बौद्धजन पंचायत समिती शाखा क्र ८२८ व संघमित्रा महिला मंडळ जुईनगर यांच्या विध्यमाने शनिवार दि ५ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी १० वाजता भव्य धम्म रॅली संपन्न झाली. नवरात्री उत्सव चौकातून रॅलीला प्रारंभ झाला संपूर्ण जुईनगर प्रभागातून बुद्धम सरणग गच्यामी वंदना घेत उपसाक उपासीका शिस्तीने संघाबरोबर चालत होते,अतिशय मंगलमय वातावरण निर्माण करून रॅली अभिनंदन हॉल सेक्टर २ नेरुळ ठिकाणी थांबली. संघाला भोजन देऊन आशीर्वाद घेण्यात आले,कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे सन्मा विजय नाहटा साहेब,उद्योजक जालिंदर औटी,मंगेश पवार,गोपाळ जाधव आदी उपस्थित राहून आशीर्वाद घेतले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सुनील शिर्के,सूर्यकांत सावंत,सिध्दार्थ साळवी,यशवंत शिंदे,समीर साळवी,शिवदास सकपाळ,बुद्धेश्वर दरेकर यांनी मेहनत घेतली. रॅलीला विभागातील तमाम उपासक उपासीका उपस्थित होते.





# गतवर्षीच्या उत्स्फूर्त प्रतिसादानंतर विष्णुजी की रसोईचा दांडिया कार्यक्रम उत्साहात

लातूर : मागील वर्षीप्रमाणे यावर्षीही विष्णुजी की रसोईच्या वतीने आयोजित दांडिया कार्यक्रमाला महिलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देऊन मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदविला. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर, अजित पाटील कव्हेकर व सौ. आदितीताई कव्हेकर यांची विशेष उपस्थिती होती. विष्णुजी की रसोईच्या संचालिका सौ. रश्मी बेळंबे यांनी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत करून या दांडिया कार्यक्रमाला सुरूवात झाली. या दांडिया खेळात डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर, अजित पाटील कव्हेकर व आदितीताई पाटील कव्हेकर यांनीही सहभाग नोंदवला. हा कार्यक्रम महिलांसाठी विशिष्ट प्रशिक्षित आयोजकांमार्फत प्रशिक्षण देण्यात आल्याने या कार्यक्रमाची रंगत अधिकच वाढत गेली. रोजच्या दैनंदिन कामाच्या दगदगीतून महिलांनी आपल्या कलाकौशल्यांची जोपासना करण्यासाठी दांडियाच्या माध्यमातून आपल्या कलागुणांना एकप्रकारे चांगले व्यासपीठ उपलब्ध करून दिले. मनोरंजनासोबतच व्यायाम व संगीताच्या मनोरंजनातून सामाजिक कार्य जोपासण्याचा प्रयत्न विष्णुजी की रसोईच्या माध्यमातून करण्यात आला. सहभागी असलेल्या महिलांनी उत्स्फूर्तपणे वेगवेगळ्या वेशभूषा व पारंपरिक पोशाखात या दांडिया कार्यक्रमाचा आनंद लुटला. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विष्णुजी की रसोई यांच्याकडून सौ. रश्मी बेळंबे यांनी विशेष प्रयत्न केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. स्नेहल आर्वीकर यांनी केले. परीक्षक म्हणून सौ. गंधाली मॅडम, मधुरा आर्वीकर, अपेक्षा आर्वीकर यांनी काम पाहिले. या दांडियाच्या निमित्ताने महिला संघटन व महिलांच्या सांस्कृतिक उपक्रमाची रेलचेल पहायला मिळाली.




# विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन वैशाली विलासराव देशमुख यांचे वाढदिवसानिमीत्त विविध क्षेत्रातील मान्यवर, पदाधिकारी, कार्येकर्ते व अधिकारी यांच्याकडून अभिष्टचिंतन

लातूर / प्रतिनिधी :- विलास सहकारी साखर कारखाना लि. च्या चेअरमन वैशाली विलासराव देशमुख यांच्या गुरुवार दि. १० आक्टोबर २०२४ रोजी वाढदिवसानिमित्त विविध क्षेत्रातील मान्यवर, संस्थाचे पदाधिकारी, संचालक मंडळ, कार्ये कते, अधिकारी यांनी त्यांची बाभळगाव निवासस्थानी भेट घेऊन अभिष्टचिंतन करून सर्वांनी उदंड आयुष्य लाभू दे अशा शुभेच्छा दिल्या. विलास सहकारी साखर कारखाना लि. च्या चेअरमन वैशाली विलासराव देशमुखजी यांचा गुरुवार दि. १० आक्टोबर २०२४ रोजी वाढदिवस बाभळगाव येथे साध्या पध्दतीने साजरा करण्यात आला. विविध क्षेत्रातील मान्यवर, संस्थाचे पदाधिकारी, संचालक मंडळ, कार्येकते, अधिकारी यांनी त्यांची बाभळगाव निवासस्थानी जाऊन भेट घेतली अभिष्टचिंतन करून सर्वांनी त्यांना उदंड आयुष्य लाभू दे अशा शुभेच्छा दिल्या. यावेळी माजी आमदार वैजनाथराव शिंदे, माजी चेअरमन धनंजय देशमुख, लातूर शहर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष किरण जाधव, विलास कारखान्याचे व्हा. चेअरमन रविंद्र काळे, रेणा सहकारी साखर कारखाना व्हा. चेअरमन अनंतराव देशमुख, व्हा. चेअरमन विजय देशमुख, जागृतीचे व्हा. चेअरमन लक्ष्मण मोरे, व्हा. चेअरमन समद पटेल, विलास कारखन्याचे कार्यकारी संचालक सजीव देसाई, कार्यकारी संचालक जितेंद्र सपाटे, जिल्हा परीषदचे माजी अध्यक्ष संतोष देशमुख, अभय सांळुके, ऋषीकेश पाटील, सत्तार शेख, रईस टाके, संगीता मोळवणे, उर्मीला मुगळे, अजय बोराडे, रुपाली बोराडे, संचालक राजकूमार पाटील, सुंदर पाटील कव्हेकर, युनुस मोमीन, संचालक संग्राम माटेकर, सत्तार शेख, विनोद वीर, युसुफ शेख, बाभळगाव उपसरपंच गोविंद देशमुख, कारखान्याचे अधिकारी मच्छींद्र बोरखडे, एल.एम.देशमुख, ओमकार ठाकरे, दिलीप जाधव, रवीकीरण सोमवंशी, धैर्यशील निबाळकर, श्रीराम शिंदे, नारायण काळूखे, साहेबराव जगताप, पांडुरंग कदम यांच्यासह विविध संस्थाचे पदाधिकारी, कार्यकर्ते यांनी बाभळगाव येथील निवासस्थानी विलास सहकारी साखर कारखाना लि. च्या चेअरमन वैशाली विलासराव देशमुख यांना भेटून शुभेच्छा दिल्या.



# मेघामाता विशाखा या दानमाता म्हणून जगप्रसिद्ध होत्या - भदन्त राहुलरत्न थेरो

मुंबई :- बौद्धजन पंचायत समिती आणि संस्कार समिती यांच्या संयुक्त विद्यमाने १६ वे श्रामणेर शिबिर डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, वाशी येथे संघनायक पूज्य भन्ते डॉ. राहुलरत्न थेरो यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच संस्कार समितीचे अध्यक्ष मंगेश पवार, सरचिटणीस मनोहर बा. मोरे यांच्या अधिपत्याखाली आयोजित करण्यात आले आहे, सदर श्रामणेर संघ भोजनदानासाठी शिवडी विभागात आमंत्रित होता सदर संघाचे शिवडी विभागात आगमन होताच भोईवाडा नाक्यावर बौद्धजन पंचायत समितीचे कार्याध्यक्ष लक्ष्मण भगत, स्थानिक गटप्रमुख राजाभाऊ तथा रामदास धो. गमरे, माजी गटप्रमुख प्रकाश कासे, विभागीय उपाध्यक्ष राजू धोत्रे, विभागीय चिटणीस अजय पवार, अनंत मोहिते, राजाराम जाधव, सामाजिक कार्यकर्ते शेळके, ऐरोली विभागाचे विश्वस्त सी. एम. कासारे, महिला मंडळाच्या जेष्ठ कार्यकर्त्या अलका मोरे, बौद्धाचार्य नारायण जाधव, अनंत यशवंते, रायबा सकपाळ, प्रकाश तांबे, मोरे, भाई जाधव त्यांचे बंधू व संपूर्ण परिवार, बाघाडे व त्यांचा संपूर्ण परिवार व विभाग कमिटीचे कार्यकर्ते, विभागातील उपासक, उपसिकांनी फुलांच्या वर्षावात भव्य स्वागत केले, ही धम्मरॅली पुष्पसुमनांचे वर्षावात डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक सभागृह, परेल - १२ येथे पोहोचली. सदर प्रसंगी महामानवांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण केल्यानंतर संघनायक पुज्य भन्ते राहुलरत्न थेरो यांनी ज्योत प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरवात करीत उपस्थितांना त्रिशरण, पंचशील दिले, तद्नंतर सर्व मान्यवरांचे स्वागत केले. भाई जाधव आणि परिवार व बाघाडे व परिवार यांच्या सहकार्याने पूज्य श्रामणेर संघास भोजनदान दिले. त्यानंतर धम्मदेसना देत असताना पूज्य भन्ते राहुलरत्न थेरो यांनी भगवान गौतम बुद्धांच्या काळात मेघामाता विशाखा या धनाढ्य व सत्ताधारी असताना देखील त्या स्वतः स्वकष्टाने भिख्खू संघास स्वतःच्या हाताने बनवलेलं भोजन दान करीत असे, एके दिवशी भगवंत आले असता त्या भगवंतांना म्हणाल्या होत्या की येणाऱ्या भन्तेजींना भोजनदान देण्यास, आजारी भन्तेजींना भोजनदान, औषधदान देण्यास मला परवानगी असावी भगवंतांनी ही मेघामाता विशाखा यांची सेवाभाववृत्ती ओळखून त्यांना हसतमुखाने परवानगी दिली, तेव्हापासून मेघामाता श्रद्धेने भन्तेजींना भोजनदान, औषधदान करू लागल्या सातत्याने अहोरात्र त्यांचं हे कार्य अविरतपणे सुरू राहील त्यामुळे त्या दानमाता म्हणून नावलौकिकास आल्या होत्या, त्यांचा नावलौकिक हळूहळू जगभर वाऱ्यासारखा पसरू लागला ही बातमी प्रसेनजीत राजाला कळताच आपण ही दानमात मेघामाता विशाखा सारख सुप्रसिद्ध व्हावं म्हणून त्याने ही भगवंतांना मला आठवड्यातून एक दिवस तरी भोजनदान करण्याची परवानगी द्यावी अशी विनंती केली, भगवंतांनी त्यांना देखील अनुमती दिली परंतु त्याठिकाणी दान घेण्यास कोणतेही भन्तेजी जात नव्हते, एकेदिवशी मेघामाता विशाखा यांच्या राहत्या ठिकाणावरून प्रसेनजीत राजा जात असताना दानमाता मेघामाता विशाखा स्वतः भिख्खू संघास भोजनदान देत आहेत हे पाहिल्यानंतर प्रसेनजीत आपल्या राज्यात गेले व दानशाळेत जाऊन भन्तेजींनी






भोजनदान घेतले का याबद्दल चौकशी केली असता कळलं की भन्तेजी याठिकाणी भोजनदान स्वीकारण्यास येत नाहीत म्हणून प्रसेनजीत राजे पुन्हा भगवंतांकडे गेले व याचना करू लागले की भगवंत आपण नाराज आहात का तुम्ही स्वतः किंवा इतर कोणतेही भन्तेजी भोजनदान स्वीकारण्यास येत नाहीत त्यावर भगवंत म्हणाले की प्रसेनजीत राजे तुम्ही जे भोजनदान देता ते सद्भावनेने न देता ते दुसऱ्याला कमी लेखण्याच्या अनुषंगाने देत असल्याने असे भोजनदान भिख्खू संघ स्वीकार करीत नाही, संघ हा याचक नसून तो स्वाभिमानी, सद्भावनेने, श्रद्धेने व शुद्ध अंतःकरणाने मिळणाऱ्या दानाचाच ते स्वीकार करतात तेव्हा प्रसेनजीत राजाला आपली चूक उमगली. अश्या प्रकारे दान परिमता या विषयावर धमदेसना देत असता भन्ते राहुलरत्न थेरो यांनी सर्वांना मार्गदर्शन केले. तसेच आजवर आम्हाला जे भोजनदान प्राप्त झाले त्यात आज भेटलेले भोजनदान हे श्रेष्ठ व उत्तम आहे उद्गार काढीत भाई जाधव परिवाराचे व बाघाडे परिवाराचे आभार व्यक्त करीत त्यांना मंगलकामना दिल्या. त्याचबरोबर मंगेश पवार गुरुजी, कार्याध्यक्ष लक्ष्मण भगत यांनी ही श्रामणेर शिबिरासंदर्भात आपले मनोगत व्यक्त केले. सरतेशेवटी संस्कार समितीचे चिटणीस मनोहर बा. मोरे यांनी सदर कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी अथक परिश्रम घेणाऱ्या विभाग आणि विभागातील सर्व उपासक, उपसिकांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

## समाजाचे विश्वासू नेते बनून समाजाला योग्य मार्गदर्शन करा. डॉ. बाबासाहेब आंबेडकर

### फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या वतीने ६८ वी वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संपन्न.

छत्रपती संभाजी नगर /प्रतिनिधी :- फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या वतीने आपल्या प्रगतीसाठी देशाला मिळणाऱ्या सत्तेमध्ये आपण भागीदार झालेच पाहिजे. करिता समाजाचे विश्वासू नेते बना आणि समाजाला योग्य मार्गदर्शन करा. या डॉ. आंबेडकरांच्या विधानावर छत्रपती संभाजी नगर येथे ६ आक्टोबरला कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

या प्रसंगी उद्घाटनपर मार्गदर्शन करताना एड. महादेव आंधळे म्हणाले की, नेत्याबद्दल समाजाला आस्था वाटली तरच नेतृत्व उदयास येऊन टिकू शकेल. देशातील सर्व प्रकारच्या निवडणूकीत वंचित, आदिवासी, बहुजन समाजाला प्रत्यक्ष भाग घेता येत नसल्याने भांडवलदारांचे प्राबल्य व घराणेशाही चालत आहे. सामान्य माणसाकडे गंगाजळी उपलब्ध नसल्याने ते प्रवाहाबाहेर फेकल्या जातात. मतदारांनी सुद्धा नैतिकतापूर्ण भूमिका सोडली आहे. परिणामी आपणच शत्रूला संधी उपलब्ध करून देत असतो. लाभार्थी समाज सुद्धा रस्त्यावर येत नसल्याने खाजगीकरणाची अंमलबजावणी होत आहे. तोडा व फोडा नीतिचा वापर करून वंचित, आदिवासींना विभाजित केले जात आहे. करिता मागासवर्गीयांनी एकत्रित येऊन विश्वासू नेत्यांना मतदान करून निवडून द्यावेत.

याप्रसंगी मिलिंद बागूल म्हणाले की, या चळवळीचा कारवाँ पुढे घेऊन जाण्यासाठी आपण सक्रीय सहभाग घेतला पाहिजे. महादेव डांबरे म्हणाले की, एका काळात हजेरी पुस्तकावर सुद्धा अस्पृश्यांचे नांव लाल अक्षरात लिहिले जायचे. गांधी टिळकांचे अनुयायी होते, ज्यांनी स्वराज्याची मागणी करून तेली,तांबोळी, कुणबटांना संसदेत जाऊन नांगर हाकायचे आहे काय? असे म्हटले होते. आपणास मिळालेले शिक्षण हे फुले शाहू आंबेडकरांची देण आहे. मत आमचे व राज तुमचे हे फार काळ चालवू नये. धनराज गोंडाणे म्हणाले की, प्रगती होण्यासाठी प्रतिनिधी उच्च शिक्षित असावेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या ध्येय धोरणांनुसार पुढे चालले पाहिजे.

प्रमुख वक्ते इंजिनिअर किशोर पाटील म्हणाले की, आपण बाबासाहेब आंबेडकरांप्रमाणे चारित्र्यसंपन्न झाले पाहिजे. या आंदोलनाचा कारवाँ पुढे नेता येत नसेल तर किमान मागे तरी जाऊ देऊ नये. यासाठी कार्य केले पाहिजे. आपण फुले शाहू आंबेडकरांना नीट समजावून घेतले पाहिजे. तसेच सक्षम व योग्य प्रतिनिधी निवडून दिले पाहिजेत.

कार्यशाळेचा अध्यक्षीय समारोप करताना फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे संचालक बी. बी. मेश्राम म्हणाले की, प्रथमतः मी त्या वर्तमानपत्राच्या सर्व संपादकाचे व त्यांच्या टीमचे



मनपूर्वक आभार व्यक्त करतो, ज्यांनी फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या बातम्या प्रकाशित केल्या आहेत. किमान सामाजिक कळकळ असणाऱ्यांनी एकत्रित चर्चेने निर्णय घेऊन अंमलबजावणी केली पाहिजे. उद्घाटक एड. महादेव आंधळे साहेबांनी म्हटल्याप्रमाणे आपण सर्व मागासवर्गीय नागवंशीय असल्याने आम्ही सुद्धा या सर्वांना संघटीत करून आंदोलन चालविण्यासाठी दि ऑल इंडिया नाग असोसिएशन अर्थात आईनाची स्थापना केली आहे. करिता सर्व व्यवहारात जीएसटी म्हणजे गुडस एंड सर्व्हिस टॅक्स देत असलो तर आंबेडकराईट आंदोलनातील सर्व कृती कार्यक्रमासाठी उत्पन्नाच्या पाच टक्के अर्थात विसावा हिस्सा हे एएसटी म्हणजे आंबेडकराईट सर्व्हिस टॅक्स दिलाच पाहिजे. या सर्व बाबी नीट समजून घेऊन देशाच्या सत्तेतील आपली भागीदारी सुनिश्चित करण्यासाठी कराव्या लागणाऱ्या उपाययोजनावर सजगता यावी म्हणून सदरील विधानावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे.

या कार्यशाळेचे सुत्रसंचालन व आभार महादेव डांबरे तर प्रास्ताविक एड. विलास रामटेके यांनी व्यक्त केले. या कार्यशाळेला इंजिनिअर किशोर पाटील, एड. महादेव आंधळे, धनराज गोंडाणे, मिलिंद बागूल, देवकांत मेश्राम, ए. एन. तायडे, बी. बी. मेश्राम इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते.

## केज मतदार संघातून राष्ट्रवादी (श.प.गट) कडून १२ उमेदवारांनी दिल्या मुलाखती

माजी आ. पृथ्वीराज साठे, माजी आ. प्रा.संगिताताई ठोंबरे,डॉ. इंजि. रोहिदास मस्के, सौ. मनीषा जाधव, डॉ. अंजलीताई घाडगे यांच्यासह इतरांचा समावेश











केज/प्रतिनिधी :- केज विधानसभा मतदार संघातून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या (शरदचंद्र पवार गट) वतीने आज शनिवार दि.५ ऑक्टो.रोजी केज विधानसभा मतदारसंघातील इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती पुणे येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (शरदचंद्र पवार गट) संस्थापक अध्यक्ष खा. शरदचंद्र पवार यांच्या उपस्थितीत मुलाखती पार पडल्या.केजमधून मुलाखतीसाठी माजी आ. पृथ्वीराज साठे,माजी आ. प्रा. सौ. संगीताताई ठोंबरे,डॉ.सौ. संपादक विजय कुमार वाव्हळ, इंजि. रोहिदास मस्के, सौ. मनीषाताई जाधव, डॉ. अंजलीताई घाडगे यांच्यासह १२ उमेदवारांनी मुलाखती दिल्या. पुणे येथे राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट)पक्षाच्या वतीने विधानसभेसाठी मुलाखती पार पडल्या. शनिवार दि. ५ ऑक्टोबर रोजी मराठवाडा, विदर्भ व उत्तर महाराष्ट्रातील विधानसभेच्या इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती संपन्न झाल्या.या मुलाखतीसाठी स्वतः खा.शरदचंद्र पवार,बीड जिल्ह्याचे खा.बजरंगबप्पा सोनवणे, ज्येष्ठ नेत्या व माजी मंत्री फौजिया खान, आ. राजेशभैय्या टोपे, आ. रोहित पवार,आ. वंदनाताई चव्हाण,बीड जिल्ह्याचे पक्ष निरीक्षक जीवनराव गोरे,राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेतेडॉ.नरेंद्र काळे, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष शेख मेहबूब तसेच इतर मान्यवर याप्रसंगी उपस्थित होते.उपस्थित उमेदवारांना स्वतः खा.शरदचंद्र पवार यांनी प्रश्न विचारून मतदार संघाच्या संदर्भातील विविध प्रश्न विचारले आणि उमेदवारांचा मतदार संघाच्या बाबतीतचा अभ्यास जाणून घेतला. मुलाखती देणाऱ्यांमध्ये माजी आ. पृथ्वीराज साठे,माजी आ. माजी आ.प्रा.सौ. संगीताताई ठोंबरे, विजय कुमार वाव्हळ, डॉ.सौ.अंजलीताई घाडगे,इंजि रोहिदास मस्के,सौ. मनीषाताई गोकुळ जाधव,रमेश गालफाडे, इंजि.एन.डी. शिंदे, ड.ज्योत्स्ना बचुटे (ससाणे ),तसेच अंकुशराव ढोबळे, यांच्यासह इतर उमेदवारांनी या ठिकाणी मुलाखती दिल्या. माजी आ.साठे, माजी आ. प्रा. सौ.संगीताताई ठोंबरे, विजय कुमार वाव्हळ, रोहिदास मस्के यांच्या प्रभावी मुलाखती दरम्यान पुणे येथे आज राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार )पक्षाच्या वतीने उपस्थित उमेदवारांना मतदारसंघाची भौगोलिक परिस्थिती राजकीय व सामाजिक योगदान आणि मतदारसंघाचे समीकरण व स्वतः केलेले कार्य याविषयी विचारणा करण्यात आले.त्यामध्ये माजी आ.पृथ्वीराज साठे,माजी आ.प्रा. सौ. संगिताताई ठोंबरे, विजय कुमार वाव्हळ,डॉ.सौ. यांची मुलाखत प्रभावी ठरली. तसेच इंजि. रोहिदास मस्के यांनी सुद्धा अभ्यासूपणे उत्तर देऊन योग्य मांडणी केल्याचे सांगण्यात आले.

## महाराष्ट्रातील नोंदीत बांधकाम कामगारांना दिवाळीपूर्वी बोनस देण्यासंदर्भात महाराष्ट्र राज्याच्या कामगार विभागाच्या प्रधान सचिव विनिता सिंगल यांच्याबरोबर सकारात्मक चर्चा.

मुंबई / प्रतिनिधी :- महाराष्ट्र राज्यातील १९ लाख नोंदीत बांधकाम कामगराना दिवाळीपूर्वी प्रत्येकी दहा हजार रुपये बोनस मिळावा अशी मागणी करण्यात आलेली आहे. या मागणी संदर्भात बोलताना बांधकाम कामगार संघटनेचे निमंत्रक कॉ.शंकर पुजारी यांनी सांगितले की. निवारा बांधकाम कामगार संघटना व इतर कामगार संघटना यांनी सन २०२१ मध्ये मुंबई उच्च न्यायालयामध्ये बोनस मिळण्यासाठी केस दाखल केलेली होती.बांधकाम कामगारांना बोनस देण्याबाबत उच्च न्यायालयामार्फत सहा महिन्यात शासनाने निर्णय करावा असा आदेश देण्यात आलेला होता. मुंबई आझाद मैदान येथे बांधकाम कामगारांची ८ ऑक्टोबर रोजी जोरदार निदर्शने सुरू असताना शिष्टमंडळाच्या वतीने प्रधान सचिव श्री.विनिता सिंगल यांच्याशी चर्चा झाली.चर्चेमध्ये कॉ.शंकर पुजारी यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या निकालाची प्रत प्रधान सचिव यांना दिल्यानंतर विनिता सिंगल यांनी असे आश्वासन दिले की याबद्दल निर्णय करू. शिष्टमंडळाच्या वतीने बोलताना कामगार नेते साथी सागर तायडे यांनी मुद्दा मांडला की ज्या जिल्ह्यांच्या मध्ये ऑनलाईन काम बंद आहे ते पूर्ववत सर्व ठिकाणी सुरू व्हावे नांव नोंदणी करतांना कामगार संघटना प्रतिनिधी यांचे सहकार्य घेण्यात यावे.विनिता सिंगल मॅडम म्हणाल्या की कामगारांनी स्वता हजर राहिले पाहिजे.याबाबतही निर्णय करू असे त्यांनी आश्वासन दिले. कामगार विभागाच्या प्रधान सचिव यांच्याबरोबर सकारात्मक चर्चा झाली.त्यामूळे आंदोलन स्थगित करण्याचा निर्णय घेण्यात आला.त्या मागण्याची पूर्तता न झाल्यास आणखीन आंदोलन करण्याचा निर्णयही घेण्यात आला.या आंदोलनाचे नेतृत्व कॉ.शंकर पुजारी,साथी सागर तायडे,साथी सुरेश पाटील,जयसिंग रणदिवे,नंदकुमार महाडिक,दीपक थोरात,काशिनाथ नकाते,मंगेश कांबळे,विशाल बडवे,प्रभाकर शिंदे,संतोष बेलदार,सलीम इनामदार,शुभांगी गावडे,शाकीरा शेरकर,रणधीर लोंढे इत्यादींनी या आंदोलनाचे नेतृत्व केले. सांगली,पालघर,बदलापूर बेलापुर पनवेल ठाणे येथील विविध संघटनाच्या प्रतिनिधिनी या धरणे निदर्शने आंदोलनात सहभाग नोंदविला.




## कमी कालावधीत वेगाने विकासकामे होत असल्याचे समाधान : आ. भीमराव केराम

### ७.५० कोटींच्या विकासकामांचे भूमिपूजन : दर्जेदार कामे करण्याची अपेक्षा

किनवट/शेख शौकत :-वृत्तसेवा : कोरोनानंतरच्या अडीच वर्षाच्या कमी कालावधीत किनवट - माहूर मतदारसंघात विकासकामे वेगाने होत आहेत, याचे अतीव समाधान आहे. होणारी विकासकामे दर्जेदार व्हावीत, अशी अपेक्षा आमदार भीमराव केराम यांनी सोमवारी (दि.०७) येथे व्यक्त केली.



आ. भीमराव केराम यांच्या स्थानिक विकास निधीतून पालिका क्षेत्रातील एकूण ७.५० कोटींच्या विविध विकासकामांचे भूमिपूजन सोमवारी आ. केराम यांच्या हस्ते करण्यात आले त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी तहसीलदार तथा पालिकेच्या प्रशासक शारदा चौंडेकर, प्र. मुख्याधिकारी मुगाजी काकडे, माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार, अशोक नेम्मानीवार, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष श्रीनिवास नेम्मानीवार, सुनील पाटील, वैजनाथ करपुडे पाटील, संतोष चनमनवार, दत्ता आडे, संदीप केंद्रे, पंढरीनाथ ठाकरे, आंधळे, विश्वास कोल्हारीकर, जगदीश तिरमनवार, नरेश सिरमनवार, विनोद भरणे, स्वागत ऐनेनीवार, गौरव इटकेपेल्लीवार, अनुसया अन्नेलवार, राजेंद्र भातनासे, जय वर्मा, व्यंकट माडपेल्लीवार, बालाजी धोतरे, शिवा क्यातमवार, आकाश भंडारे, किशोर देवतळे, ज्येष्ठ पत्रकार मिलिंद सरपे, संतोष सिसले व स्वप्निल भालेराव आदींची उपस्थिती होती. यावेळी आ. केराम यांच्या हस्ते शहराच्या प्रभाग क्रं. ०६ मधील शिशुवाटिकेत योगाभवन उभारुन परिसराचा विकास करणे, याच प्रभागातील श्री. कृष्ण मंदिरात पेवर ब्लॉक बसविणे, प्रभाग २ मधील बुद्धविहारात समाजमंदिर उभारणे, याच प्रभागातील साठेनगरात मातंग समाजमंदिर उभारणे, हनुमान मंदिरालगत सभागृह, प्रभाग १ मधील अक्सा मशिदीत पार्किंग पेवर ब्लॉक बसविणे, याच प्रभागात अंतर्गत सीसी रस्ते, प्रभाग ३ मधील गुरुकूल शाळेजवळ सीसी रस्ता, प्रभाग क्रं. ३ व ४ मधील अंतर्गत सीसी रस्त्याच्या निर्माणाचे भूमिपूजन करण्यात आले.

## मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिल्या बद्दल केंद्र सरकारचे अभिनंदन-वसुदेव गायकवाड

केज/ प्रतिनिधी :- मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळवून दिल्याबद्दल केंद्र सरकारने मनापासून अभिनंदन व आभारही असे मत जेष्ठ विचारवंत, नेस्ठ समाजसेवक, आनंद ग्रामीण विकास प्रतिष्ठाण व स्वानंद सार्वजनिक वाचलय, आनंदगांव ता. केज. जि. बीडचे संस्थापक वसुदेव( बप्पा) गायकवाड यांनी व्यक्त केले. २०१३ मध्ये राज्य सरकारने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठी केंद्र सरकार कडे शिफारस केली होती. त्या आधारे २०२४ मध्ये केंद्र सरकारने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिला त्याबददल केंद्र सरकारचे व राज्य सरकारचेही विशेष अभिनंदन व आभार वसुदेव( बप्पा) गायकवाड यांनी व्यक्त केले. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यामुळे मराठी भाषेच्या



सर्वांगीण विकासासाठी केंद्र सरकारचा मोठा निधी यापुढे मिळत राहील व मराठी भाषेच्या विकासाला निश्चित चालना मिळेल यात आता तिळमात्र शंका नाही. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यामुळे मराठी भाषेची भरभराट होईल म्हणून केंद्र सरकारचे विषेश अभिनंदन व आभार वसुदेव ( बप्पा) गायकवाड यांनी व्यक्त केले आहे.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE